मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पीएमपीएमएल संचालक बैठकीत प्रवासी सुरक्षितता व कार्यक्षमतेवर भर!

## ज्येष्ठांना ५०% पास सवलत; अपघातग्रस्तांना ३ लाखांपर्यंत मदत; फीडर सेवेलाही मिळणार चालना!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) संचालक मंडळाच्या बैठकीत प्रवासी सुरक्षितता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता, बस अपघातांतील नुकसानभरपाई, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, निविदा व लेखापरीक्षणासह विविध प्रशासकीय व आर्थिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना पीएमपीएमएलच्या बस पासमध्ये ५० टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी बैठकीस उपस्थित राहून पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित विविध मुद्द्यांवर सूचना मांडल्या.**





बैठकीस पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, स्थायी समिती सभापती श्रीनाथ भिमाले, संचालक शैलेश खेडेकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आवाड यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक लोकाभिमुख, सुरक्षित आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना पीएमपीएमएलच्या बस पासमध्ये ५० टक्के सवलत लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून, सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर त्यांच्यासाठी अधिक सुलभ आणि परवडणारा होणार आहे.

प्रवासी सुरक्षिततेच्या दृष्टीने पीएमपीएमएलच्या स्वमालकीच्या तसेच भाडेतत्त्वावरील बसेसमध्ये डॅशकॅम बसविण्याच्या विषयावरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बसमधील तसेच बसच्या मार्गावरील घटनांची वस्तुनिष्ठ नोंद उपलब्ध होण्यास डॅशकॅम यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे. अपघात किंवा अन्य अनुचित घटना घडल्यास संबंधित घटनेची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी या यंत्रणेचा उपयोग होणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.


पीएमपीएमएलच्या बस अपघातांमध्ये मृत्यू अथवा दुखापत झाल्यास संबंधितांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईबाबत निश्चित आणि सुस्पष्ट धोरण आखण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार बस अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीस १ लाख रुपयांपर्यंत, तर दुर्दैवी मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्तीच्या वारसांना ३ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच अपघातात मालमत्तेचे नुकसान झाल्यास अशा प्रकरणांमध्ये कार्यवाही अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि संवेदनशील पद्धतीने करून प्रवासीहिताचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला.

### ३७ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय!

यासोबतच महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने पात्र कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्यासंबंधी विषय तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रशासकीय विषयांचा विचार करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर नियमांच्या चौकटीत सकारात्मक व कालबद्ध कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला. तसेच ३७ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

शहरांच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नवीन बसेसची उपलब्धता, प्रवासी संख्येनुसार बसफेऱ्यांचे योग्य नियोजन, मेट्रो आणि अन्य सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला

कमी करणे या बाबींचाही बैठकीत आढावा घेण्यात आला.




उपलब्ध बस ताफ्याचा जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करून नागरिकांना वेळेवर, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

महामंडळाच्या प्रशासकीय आणि आर्थिक कामकाजामध्ये पारदर्शकता तसेच उत्तरदायित्व कायम ठेवण्याच्या दृष्टीने विविध महत्त्वाच्या बाबींचाही आढावा घेण्यात आला. यामध्ये निविदा प्रक्रिया, वैधानिक लेखापरीक्षण, वार्षिक अनुपालन अहवाल, वस्तू व सेवा कर (GST), स्रोतावर करकपात (TDS), व्यावसायिक कर (PT) तसेच कंपनी निबंधक कार्यालयाशी (ROC) संबंधित अनुपालनाच्या विषयांचा समावेश होता.

एकूणच, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांना गती देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

> “पीएमपीएमएल ही पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना बस पासमध्ये ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि लोकाभिमुख निर्णय आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ व परवडणारा होईल. त्याचबरोबर अपघातातील जखमींना १ लाख आणि दुर्दैवी मृत्यू झाल्यास ३ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याच्या निर्णयामुळे प्रवाशांना अधिक ठोस सुरक्षाकवच मिळेल. नवीन बसेसची उपलब्धता, सक्षम फीडर सेवा आणि ब्रेकडाऊनचे प्रमाण कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. नागरिकांना सुरक्षित, वेळेवर, सुलभ आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पीएमपीएमएलची कार्यक्षमता अधिक वाढविण्यावर आमचा भर राहील.”
>
> -रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> “६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना बस पासमध्ये ५० टक्के सवलत देण्याच्या निर्णयामुळे हजारो ज्येष्ठ नागरिकांना थेट लाभ मिळणार आहे. त्याचबरोबर अपघातग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत निश्चित धोरण केल्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळेल. पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असल्याने उपलब्ध बस ताफ्याचा प्रभावी वापर, नवीन बसेस, फीडर सेवेचे सक्षम जाळे, बस ब्रेकडाऊनचे प्रमाण कमी करणे आणि प्रवासी सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या बाबींवर प्राधान्याने कार्यवाही होणे आवश्यक आहे. पीएमपीएमएलची सेवा अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित करण्यासह प्रवासीहिताचे निर्णय प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल.”
>
> -अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# अनधिकृत बांधकामांवर PCMCची धडक कारवाई'!

## क्षेत्रनिहाय नियमित सर्वेक्षणाचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांचे निर्देश!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे तसेच अनधिकृत टपऱ्यांवर प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी क्षेत्रनिहाय सर्वेक्षण करून निष्कासनाची मोहीम जलद गतीने राबविण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले. तसेच कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



> "पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर सातत्याने आणि प्रभावीपणे कारवाई करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. बीट निरीक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्राची नियमित पाहणी करून नव्याने होणारी अनधिकृत बांधकामे तातडीने निदर्शनास आणून त्यावर नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणे, अनधिकृत टपऱ्या तसेच पदपथांवरील अतिक्रमणे प्राधान्याने हटविण्यात येत आहेत. अनधिकृत बांधकामे किंवा अतिक्रमणे होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात येत आहे. या कामात कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याकडून हलगर्जीपणा झाल्यास त्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भावनातील मधुकर पवळे सभागृह येथे शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस बांधकाम परवानगी विभागाचे सह शहर अभियंता सुनील बागवानी यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच बीट निरीक्षक उपस्थित होते.

बैठकीमध्ये सर्व क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत बीट निरीक्षकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक बीट निरीक्षकाने त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्राची नियमित पाहणी करून नव्याने सुरू झालेली तसेच सद्यस्थितीत सुरू असलेली अनधिकृत बांधकामे ओळखून त्यांचे सर्वेक्षण करावे. सर्वेक्षणादरम्यान आढळून आलेल्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार तातडीने निष्कासनाची कारवाई करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिल्या.

महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांवर झालेली अतिक्रमणे तसेच अनधिकृत व विनापरवाना टपऱ्यांवर प्राधान्याने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच सार्वजनिक पदपथांवर झालेली अतिक्रमणे निष्कासित करून नागरिकांसाठी पदपथ मोकळे व वापरायोग्य ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांच्या प्रकरणांमध्ये केवळ तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याऐवजी संबंधित क्षेत्रातील परिस्थितीची नियमित पाहणी करून स्वतःहून अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे शोधून त्यावर तातडीने कारवाई करावी. याशिवाय, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमित गस्त व पाहणी करावी. कारवाईसाठी आवश्यक असलेले नियोजन, मनुष्यबळ व यंत्रसामग्री यांचा योग्य समन्वय साधून निष्कासनाची कार्यवाही प्रभावीपणे राबवावी.

अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधातील कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी स्पष्ट केले.

# जिल्हा रुग्णालयात महिनाभरात १०० बेडचा क्रिटिकल केअर ब्लॉक!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड येथील जिल्हा रुग्णालयाचा विस्तार करून अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय म्हणून विकसित करण्यात येणार आहे. रुग्णालयातील १०० खाटांचा क्रिटिकल केअर ब्लॉक महिनाभरात कार्यान्वित करण्याचे निर्देश आमदार शंकर जगताप यांनी दिले.**



> "सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदृष्टीतून आणि महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रामध्ये आरोग्य सेवा अधिक बळकट होत आहे. याच माध्यमातून हे जिल्हा रुग्णालय अधिक सक्षम, सुरक्षित, सुविधायुक्त आणि रुग्णाभिमुख करण्यासाठी सूचना केल्या आहे. जिल्हा रुग्णालयाचा विस्तार करून ते अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या रूपात रुग्णसेवेत आणण्यासाठी आवश्यक कामांना गती देण्यात येत आहे. रुग्णालयातील १०० खाटांचा 'क्रिटिकल केअर ब्लॉक' लवकरात लवकर कार्यान्वित व्हावा यासाठी प्रत्येक कामाचा नियमित पाठपुरावा केला जाईल."
>
> – शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदार संघ.

जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधा, अंतर्गत समस्या आणि प्रलंबित विकासकामांचा आमदार शंकर जगताप यांनी सोमवारी (ता. २४) संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा घेतला. यावेळी त्यांनी रुग्णालयातील MRI, CT SCAN आणि X-RAY युनिटची प्रत्यक्ष पाहणी केली. उपलब्ध वैद्यकीय सुविधा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

नवीन १०० बेडच्या क्रिटिकल केअर ब्लॉकमध्ये दोन ऑपरेशन थिएटर, ICU, अत्याधुनिक वॉर्ड आणि OPDची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय रुग्णालयातील बर्न वॉर्ड, SNCU आणि अतिरिक्त आंतररुग्ण विभागाच्या कामांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे. या सर्व सुविधा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर गंभीर आजारांवरील उपचारांसाठी रुग्णांना खासगी किंवा दूरच्या रुग्णालयांवर अवलंबून राहण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेऊन बाह्यरुग्ण विभागाची (OPD) क्षमता वाढविण्याच्या सूचनाही आमदार जगताप यांनी दिल्या. उपलब्ध मनुष्यबळ, डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि अत्याधुनिक यंत्रसामग्रीचे योग्य नियोजन करून रुग्णांना आवश्यक आरोग्य सुविधा वेळेत मिळतील, याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी रुग्णालयातील स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, अग्निसुरक्षा, औषध भांडार, प्रशासकीय कार्यालय, पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. रुग्णालय परिसरातील विविध पायाभूत सुविधांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

बर्न वॉर्ड, SNCU विभाग, अतिरिक्त आंतररुग्ण कक्ष, STP व ETP प्रकल्प, पोलिस मदत केंद्र तसेच रुग्णांच्या नातेवाइकांसाठी प्रतीक्षालयाची प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. रुग्णालयातील सुविधा वाढविताना रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यावरही भर देण्यात आला.

यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले की, पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून येणाऱ्या रुग्णांसाठी जिल्हा रुग्णालय हे महत्त्वाचे आरोग्य केंद्र ठरत आहे. नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या १०० बेडच्या माध्यमातून गंभीर आणि गरजू रुग्णांना तातडीने चांगली आरोग्यसेवा मिळेल. जिल्हा रुग्णालयाला सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, दर्जेदार आणि वेळेत उपचार देणारे प्रमुख आरोग्य केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीस नगरसेविका तृप्ती कांबळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त प्रदीप ठेंगल, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भाग्यश्री थोपटे, उरो रुग्णालय अधीक्षक डॉ. अभिजीत होसमनी, अग्निशामक अधिकारी व्यंकटेश दुर्वास, उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, रुग्ण कल्याण समिती सदस्य डॉ. देविदास शेलार, राष्ट्रीय आरोग्य अभियान उपअभियंता मंदार कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहायक अभियंता प्रतीक्षा काळे (सिव्हील), तानाजी थोपटे (इलेक्ट्रिक), अभियंता अनिल गाडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# सूस-म्हाळुंगे खड्डा दुर्घटनेतील मृत मुलाच्या कुटुंबाला 6 लाखांची मदत!

## भिमाले यांचे आयुक्तांना निर्देश; दोषी अधिकारी, अभियंता व कंत्राटदारांवर कारवाईची मागणी!

**» पुणे | प्रतिनिधी**

**सूस-म्हाळुंगे रस्त्यावरील खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात दहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याच्या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे. मृत मुलाच्या कुटुंबाला उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहा लाख रुपये नुकसानभरपाई तातडीने देण्याची कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना दिले आहेत.**





सूस-म्हाळुंगे रस्त्यावरील खड्ड्यामुळे दुचाकी घसरून झालेल्या दुर्घटनेत दहा वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर भिमाले यांनी आयुक्तांना पत्र देऊन मृत मुलाच्या कुटुंबाला न्यायालयाच्या आदेशानुसार नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

मुलाचा मृत्यू रस्त्यावरील खड्ड्यामुळे झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्यास महापालिकेने हे प्रकरण स्वतःहून संबंधित समितीसमोर ठेवावे आणि सहा लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, असे भिमाले यांनी पत्रात नमूद केले आहे.

संबंधित रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी नेमकी कोणत्या विभागाकडे होती, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. खड्डा वेळेत दुरुस्त न केल्यास त्यासाठी जबाबदार अधिकारी, अभियंता किंवा कंत्राटदाराची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, अशी सूचना भिमाले यांनी केली.

शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असून, अशा घटनांना आळा घालण्यासाठी महापालिकेने अधिक प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांतील नुकसानभरपाईसाठी नागरिकांना स्वतंत्रपणे धावपळ करावी लागू नये, यासाठी सोपी, पारदर्शक आणि स्वतंत्र कार्यपद्धती तयार करण्याची सूचनाही त्यांनी केली.

रस्त्यांची नियमित पाहणी, खड्डे आढळल्यानंतर तातडीने दुरुस्ती आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्याची प्रभावी व्यवस्था निर्माण केल्यास भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

> "सूस-म्हाळुंगे येथील खड्ड्यामुळे दहा वर्षांच्या मुलाचा झालेला मृत्यू ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. मृत मुलाच्या कुटुंबाला उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६ लाख रुपयांची नुकसानभरपाई तातडीने मिळावी. तसेच खड्डा वेळेत दुरुस्त न करणाऱ्या संबंधित अधिकारी, अभियंता आणि कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शहरातील रस्त्यांची नियमित पाहणी आणि खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची प्रभावी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे."
>
> -श्रीनाथ भिमाले, **स्थायी समिती अध्यक्ष.**

### दोषींवर कारवाईची मागणी!

सूस-म्हाळुंगे रस्त्यावरील खड्ड्यामुळे दहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याने संबंधित रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. खड्डा वेळेत दुरुस्त न करणाऱ्या अधिकारी, अभियंता आणि कंत्राटदारांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांसाठी नुकसानभरपाईची स्वतंत्र व सुलभ कार्यपद्धती तयार करावी, अशी सूचना श्रीनाथ भिमाले यांनी केली.

# पुण्यात आदिवासी विद्यार्थ्यांचे १० दिवसांपासून उपोषण; राहुल गांधींचे फडणवीसांना पत्र!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील मांजरी येथे शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे विविध मागण्यांसाठी गेल्या १० दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरू आहे. विद्यार्थ्यांनी राज्य सरकारसमोर सुमारे ४० मागण्या मांडल्या असून, या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. मात्र, अद्याप या प्रश्नावर सरकारकडून ठोस तोडगा निघालेला नाही.**





या आंदोलनाची दखल आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी घेतली आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पुण्यात आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्यावर त्वरित तोडगा काढावा, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले आहे.

राहुल गांधी यांनी आपल्या पत्रात महाराष्ट्रातील अनेक आदिवासी विद्यार्थी आपल्या हक्कांसाठी १० दिवसांपेक्षा अधिक काळापासून उपोषणाला बसल्याचे नमूद केले आहे. पुण्यातील 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमादरम्यान काही विद्यार्थिनींनी वसतिगृहांशी संबंधित विविध समस्या मांडल्याचाही त्यांनी उल्लेख केला आहे.

वसतिगृहांसाठी लादण्यात आलेली वयोमर्यादा, विद्यार्थ्यांना अपमानजनक वाटणारे काही नियम, असुरक्षित सुविधा तसेच गर्भधारणा चाचणीसारख्या मुद्द्यांबाबत विद्यार्थिनींनी चिंता व्यक्त केल्याचे राहुल गांधी यांनी पत्रात म्हटले आहे. अशा नियमांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचत असून त्यांच्या शिक्षणातही अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या मागण्या केवळ वसतिगृहाच्या सुविधांपुरत्या मर्यादित नसून त्यांच्या शिक्षणाशी, सुरक्षिततेशी आणि मूलभूत अधिकारांशी संबंधित असल्याचे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

दुर्गम भागातून, गावांमधून आणि शहरांतून शिक्षणासाठी आलेले हे विद्यार्थी कोणतीही खैरात मागत नाहीत, तर आपले हक्क मागत आहेत, असे राहुल गांधी यांनी पत्रात म्हटले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः त्यांची भेट घ्यावी आणि त्यांच्या मागण्या समजून घ्याव्यात, अशी विनंती त्यांनी केली.

आदिवासी विद्यार्थ्यांनी सुमारे ४० मागण्यांसाठी सुरू केलेले बेमुदत उपोषण अद्याप सुरूच आहे. आंदोलनाला दिवसेंदिवस वाढता कालावधी होत असताना विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारकडून कोणता निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राहुल गांधी यांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिल्याने या आंदोलनाला आता राजकीयदृष्ट्याही महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर चर्चा करून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकार पुढाकार घेणार का आणि आंदोलन मागे घेण्यासाठी कोणता तोडगा काढला जाणार, याकडे पुण्यासह राज्यातील आदिवासी विद्यार्थी आणि त्यांच्या संघटनांचे लक्ष आहे.

### राहुल गांधींची मुख्यमंत्र्यांकडे मागणी!


"आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यांच्या प्रश्नांवर त्वरित तोडगा काढावा." "आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे सरकारने तातडीने आणि संवेदनशीलतेने लक्ष देण्याची गरज आहे. गेल्या अनेक दिवसांपासून विद्यार्थी आपल्या हक्कांसाठी उपोषण करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून तातडीने तोडगा काढावा आणि त्यांचे शिक्षण व भवितव्य सुरक्षित राहील, याची सरकारने काळजी घ्यावी."

# शिरूरमध्ये अखेर नरभक्षक बिबट्या जेरबंद; ग्रामस्थांना मोठा दिलासा!

## महिनाभरापासून सुरू होती शोधमोहीम; ड्रोनच्या मदतीने वन विभागाची कारवाई!

**» पुणे | प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील पिंपळसुटी, इनामगाव, मांडवगण फराटा, शिरसगाव काटा तसेच परिसरातील गावांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या नरभक्षक बिबट्याला अखेर वन विभागाने जेरबंद केले. इनामगाव हद्दीतील नळगे मळा परिसरात भक्ष्याच्या शोधात आलेल्या बिबट्याला वन विभागाच्या पथकाने पकडले. त्यानंतर बिबट्याला उपचार आणि निरीक्षणासाठी जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात पाठविण्यात आले.**



गेल्या महिनाभरापासून या बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाकडून विशेष आणि व्यापक शोधमोहीम राबविण्यात येत होती. पिंपळसुटी गावातील भाग्यश्री वारे या चिमुकलीचा २२ जुलै रोजी बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर पिंपळसुटीसह परिसरातील नागरिकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली होती. बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करून नागरिकांना सुरक्षितता मिळावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलनही केले होते.

या पार्श्वभूमीवर वन विभागाने बिबट्याला पकडण्यासाठी विशेष नियोजन करत व्यापक शोधमोहीम हाती घेतली. या मोहिमेदरम्यान बिबट्याच्या हालचाली आणि त्याच्या संभाव्य मार्गांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सुमारे १५ पिंजरे, ५० ट्रॅप कॅमेरे तसेच ड्रोनचा वापर करण्यात आला. बिबट्याच्या वावराचा मागोवा घेऊन तो ज्या भागात येण्याची शक्यता आहे, अशा विविध ठिकाणी पिंजरे लावण्यात आले होते.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी रेस्क्यू टीमकडूनही सातत्याने प्रयत्न सुरू होते. मागील सहा दिवसांपासून रेस्क्यू टीमचे डॉक्टर पिंजऱ्यांच्या परिसरात उपस्थित राहून बिबट्याच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत होते. बिबट्याच्या हालचालींचा अंदाज घेत योग्य ठिकाणी आणि योग्य वेळी कारवाई करण्यासाठी पथकाकडून सातत्याने निरीक्षण केले जात होते.

अखेर वन विभागाच्या या प्रयत्नांना यश आले. इनामगाव हद्दीतील नळगे मळा परिसरात श्रीनिवास घाडगे यांच्या शेताजवळ भक्ष्याच्या शोधात आलेला बिबट्या पिंजऱ्यात अडकला. बिबट्या जेरबंद झाल्याचे लक्षात येताच वन विभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील उपचार आणि वैद्यकीय निरीक्षणासाठी या बिबट्याला जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात पाठविण्यात आले.

दरम्यान, गेल्या काही दिवसांमध्ये पिंपळसुटी आणि आजूबाजूच्या परिसरातून तब्बल सहा बिबटे पकडण्यात शिरूर वन विभागाला यश आले आहे. तसेच डिसेंबर २०२५ पासून आतापर्यंत शिरूर वन विभागाच्या हद्दीत ९३ हून अधिक बिबटे जेरबंद करण्यात आल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वन विभागाकडून सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.

ही संपूर्ण कारवाई जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, सहायक उपवनसंरक्षक स्मिता राजहंस आणि शिरूर तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वनपाल भानुदास शिंदे, वनरक्षक गणेश डोईफोडे, जालिंदर सानप, शेखर जानवळकर, गणेश झिरपे आणि नाना चव्हाण यांच्यासह रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

या मोहिमेसाठी रेस्क्यू चॅरिटेबल संस्था, बावधनचे श्रीनाथ चव्हाण, डॉ. समृद्धी खांडे, संजोग गळे, अथर्व काळे, वैभव भोगले, सागर सुतार आणि प्रचिती भूतकर यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले. वन विभाग आणि रेस्क्यू टीमच्या संयुक्त प्रयत्नांमुळे अखेर नागरिकांच्या दहशतीचे कारण ठरलेला बिबट्या जेरबंद करण्यात यश आले.

नरभक्षक बिबट्या जेरबंद झाल्याने पिंपळसुटीसह इनामगाव, मांडवगण फराटा, शिरसगाव काटा आणि आजूबाजूच्या गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या भीतीमुळे नागरिकांमध्ये असलेले दहशतीचे वातावरण कमी होण्यास या कारवाईमुळे मदत होणार आहे.

# साखरेच्या दराला लगाम; पुण्यात ६९ वरून ६३ रुपयांवर भाव!

**» पुणे | प्रतिनिधी**

**गेल्या आठवड्यात देशांतर्गत बाजारात साखरेच्या दरात अचानक मोठी वाढ झाल्याने गृहिणींचे बजेट कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, केंद्र सरकारने साठेबाजीविरोधात कठोर पावले उचलल्यानंतर साखरेच्या दरातील तेजीला लगाम बसला असून, दर आता उतरणीला लागले आहेत. पुण्यातील किरकोळ बाजारात ६९ रुपयांपर्यंत पोहोचलेली साखर सोमवारी ६३ रुपये किलोवर आली.**



साखरेचे दर नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकारकडून साखर कारखान्यांकडील उपलब्ध साठ्याची प्रत्यक्ष पाहणी सुरू करण्यात आली आहे. तसेच साखरेचा मोठ्या प्रमाणात वापर करणाऱ्या सॉफ्ट ड्रिंक्स, बिस्किटे, चॉकलेट आणि आईस्क्रीम उत्पादकांसारख्या औद्योगिक खरेदीदारांवरही साठा मर्यादा लागू करण्यात आली आहे.

साठेबाजीला आळा घालण्यासाठी विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आली असून, व्यापाऱ्यांच्या गोदामांची थेट तपासणी केली जात आहे. सरकारच्या या कारवाईमुळे बाजारात साखरेचा पुरवठा वाढण्यास सुरुवात झाली असून, मागणी आणि पुरवठ्यात संतुलन निर्माण होण्याची शक्यता आहे.

साखर व्यापारी ईश्वर नहार यांच्या मते, साखरेतील तात्पुरती तेजी आता ओसरली असून दर नियंत्रणात येत आहेत. किरकोळ बाजारातील साखरेचे भाव सध्या ६३ रुपयांच्या आसपास स्थिर राहण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, साखर कारखाने १५ ऑक्टोबरपासून सुरू झाल्यास साखरेच्या उपलब्धतेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, असा विश्वास वेस्टर्न महाराष्ट्र शुगर मिल असोसिएशनचे (विस्मा) अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केला. साखरेचे दर प्रथमच क्विंटलला सात हजार रुपयांपर्यंत पोहोचले होते. मात्र, त्यानंतर अवघ्या तीन दिवसांत तेजीला लगाम बसला असून, सोमवारी भाव साडेपाच हजार रुपयांच्या आसपास स्थिर झाले. येत्या काळात हे दर पाच हजार रुपयांपर्यंत खाली येण्याची शक्यता काही कारखानदारांनी व्यक्त केली आहे.

### साखरेचे दर आणखी घसरण्याची शक्यता!

केंद्र सरकारच्या साठेबाजीविरोधी कारवाईमुळे बाजारातील साखरेचा पुरवठा वाढत असून, साखरेचे दर सध्या ६३ रुपये किलोवर आले आहेत. आगामी काळात पुरवठा वाढल्यास किरकोळ बाजारातील दर आणखी कमी होण्याची शक्यता व्यापारी आणि कारखानदारांनी व्यक्त केली आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष प्रकाश नाईक नवरे यांनी साखरेच्या दरवाढीबाबत महत्त्वाची माहिती दिली. ऊस मोठ्या प्रमाणावर इथेनॉल निर्मितीसाठी वळवला जात असल्याची चर्चा ही अफवा असून, सध्याची दरवाढ कृत्रिम असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या दोन दिवसांपासून साखरेचे दर सातत्याने खाली येत असून, सरकारने घेतलेल्या निर्णयांमुळे बाजारातील दर स्थिर होण्यास सुरुवात झाली आहे. आगामी काळात दर आणखी खाली येण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी साखरेच्या दरवाढीमागे व्यापाऱ्यांकडून करण्यात आलेली कृत्रिम साठेबाजी कारणीभूत असल्याचे सांगितले. मात्र, सरकारने साठेबाजीविरोधात मोहीम सुरू केल्याने बाजारात मुबलक प्रमाणात साखर उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे मागणी आणि पुरवठ्यामध्ये संतुलन राखले जाण्याची शक्यता असून, ग्राहकांना त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

साखरेचे दर सध्या नियंत्रणात आले असले तरी पुढील काही दिवसांत बाजारातील पुरवठा, साठेबाजीविरोधातील कारवाई आणि साखर कारखान्यांच्या गाळप हंगामावर दरांची दिशा अवलंबून राहणार आहे.